**शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या मंजुरीबाबत....**
**प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीच्या अधिकारांत सुधारणा करण्याबाबत..**

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०२२/प्र.क्र.१२०/राकावि-२

गोकुलदास तेजपाल रूग्णालय आवार, संकूल इमारत
१० वा मजला बी-विंग, मंत्रालय, मुंबई - ४००००१
दिनांक : १७ जानेवारी, २०२३

वाचा -

1) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि-२, दिनांक १६ मार्च, २०१६.**
2) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-२०१८/ प्र.क्र.४८८/ २०१८/ राकावि-२, दिनांक ०६ जून, २०१९.**

**प्रस्तावना :-**

शासकीय अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय यामधील तरतुदींच्या अधीन राहून वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती मंजुर करण्यात येते. संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये रु.३ लक्ष पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना मंजुरी देण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना आहेत. या मर्यादेबाहेरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची प्रकरणे संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून सादर केली जातात. तथापि, वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीच्या प्रस्तावांची प्रलंबित प्रकरणे लक्षात घेता, सदर अधिकार पुन:प्रत्यापित करण्याची मागणी विविध मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून करण्यात येत आहे. सबब, सदर मागणीच्या अनुषंगाने आता दि. ०६ जून, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यांनतर वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख फक्त) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरी देण्याच्या विभागप्रमुखांच्या वित्तीय अधिकारात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

आता सदर शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यांनतर वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय यामधील तरतुदींच्या अधीन राहून वित्तीय अधिकारांत खालीलप्रमाणे बदल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

| अ.क्र. | सक्षम प्राधिकारी | पूर्वीचे अधिकार | सुधारीत अधिकार |
|---|---|---|---|
| १ | मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुख | रुपये-३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) वरील प्रकरणे. | रुपये-५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष) वरील प्रकरणे. |
| २ | विभागप्रमुख | रुपये-३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) पर्यंतची प्रकरणे. | रुपये-३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) वरील परंतु रुपये-५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष) पर्यंतची प्रकरणे. |
| ३ | प्रादेशिक विभागप्रमुख | रुपये-२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) पर्यंतची प्रकरणे. | रुपये-३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) पर्यंतची प्रकरणे. |

२. शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, वर नमूद केल्याप्रमाणे मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुख, विभागप्रमुख व प्रादेशिक विभागप्रमुख यांच्या स्तरावर प्रकरणांना मंजुरी देताना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यांनतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदी काटेकोरपणे तपासून मंजुरी देण्याची जबाबदारी सक्षम प्राधिकाऱ्याची राहील.

३. हा शासन निर्णय प्रलंबित प्रकरणांनादेखील लागू करण्यांत यावा, मात्र यापुर्वीची निर्णयीत ठरलेली प्रकरणे पुन्हा सुरु करण्यांत येऊ नये.

४. संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीच्या मंजूरी करीता त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या कार्यालयांमध्ये विभागप्रमुख व प्रादेशिक विभागप्रमुख हे नेमके कोणते पदधारक असतील याबाबत त्यांनी आकृतीबंधातील मंजुर पदनाम विचारात घेऊन त्यांचे स्तरावर उचित निर्णय घ्यावा.

५. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी हा शासन निर्णय त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यासने व कार्यालये यांना कळविण्याची व्यवस्था करावी.

६. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४२/सेवा-५, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०११७१५०१३७५६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK NIVARTTI KENDRE

Digitally signed by DEEPAK NIVARTTI KENDRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=40fdba39a26dd429d5be80f9cd76998906ed5012a776fbe5072661d97c2c56c9, pseudonym=BF4C0C742439A64408C0621CD1FF33CD1AD8C6B9, serialNumber=C351F74FB3439ACA71466FCFBB2509C3310AE753E395A89FFA7C6E3887B0AADF,
cn=DEEPAK NIVARTTI KENDRE
Date: 2023.01.17 15:53:45 +05'30'

**(दीपक नि. केंद्रे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुबई.
३) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव,मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
५) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) मा.मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१०) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
११) सेंटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लफ लॅंड रेकॉर्डस, पुणे
१२) विभागीय आयुक्त (सर्व),
१३) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे),
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
१५) महालेखापाल-१ , (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१६) महालेखापाल- २, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर,

१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८) सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९) चीफ ऑडिटर लोकल फंड्स अकाऊंटस, मुंबई.
२०) सर्व कोषगार अधिकारी,
२१) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
२२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
२३) संचालक, आयुर्वेद, मुंबई,
२४) संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई,
२५) व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई,
२६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई,
२७) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व),
२८) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व),
२९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
३०) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व),
३१) प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
३२) प्रोथोनेटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
३३) वित्त विभाग, (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई,
३४) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,
३५) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन),मंत्रालय, मुंबई,
३६) निवडनस्ती (राकावि-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनांना विनंती करण्यात येते की,त्यांनी सदर शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनांना पाठवाव्यात. तसेच, संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.